महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

सोमवार ■ ०४ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०४४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


# कल्याण-डोंबिवली परिसर भाजपमय करा

## महापालिकेवर भाजपचे कमळ फुलवा - रवींद्र चव्हाण यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील नागरिकांचा श्वास नागरी समस्यांमुळे गुदमरला आहे. या गुदमरलेपणातून नागरिकांची सुटका करण्यासाठी, विकासाचे महत्वकांक्षी प्रश्न मार्गी लावायचे असतील तर कल्याण डोंबिवली महापालिकेवर येत्या काळात भारतीय जनता पक्षाचाच महापौर बसणे आवश्यक आहे, असे मत भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी रविवारी येथे व्यक्त केले.

कल्याण मधील महाजनवाडी सभागृहात आयोजित कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते जतिन प्रजापती यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी रविवारी भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी येत्या काळात कल्याण डोंबिवली पालिकेवर भाजपचा महापौर असणे किती महत्वाचे आहे हे शहरात निर्माण झालेल्या नागरी समस्या, रखडलेले विकास प्रकल्पांच्या माध्यमातून सांगितले. या कार्यक्रमाला भाजप नेते, माजी केंद्रीय राज्यमंत्री कपील पाटील, आमदार सुलभा गायकवाड, भाजप कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब, ज्येष्ठ नेते जगन्नाथ पाटील उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून राज्याच्या विविध भागात विकासाचे अनेक नवीन प्रकल्प राबविले जात आहेत. विकासाचा हा झंझावात पाहून राज्याच्या विविध भागातील अन्य पक्षांमधील नेते, पदाधिकारी, लोकप्रतिनिधी भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. अशाच पध्दतीने कल्याण, डोंबिवली शहर परिसर आपणास आता भाजपमय करायचा आहे. यासाठी सर्व कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी संघटनेच्या उत्कर्षासाठी एकत्रितपणे कामाला लागायचे आहे, अशा सूचना प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी कार्यकर्त्यांना केल्या.

भाजपमध्ये प्रवेश केला म्हणून शांत बसून राहू नका, आपल्या शहर परिसरातील नागरिकांच्या नागरी समस्या मार्गी लावण्यासाठी कामाला लागला. त्यांचे पालिका आणि इतर शासकीय यंत्रणांशी निगडित प्रश्न सोडविण्याच्या मागे लागा, अशाही सूचना प्रदेशाध्यांनी कार्यकर्त्यांना केल्या.

कल्याण शहरातील सामाजिक वर्तुळात सामाजिक कार्यकर्ते जतिन प्रजापती यांचे नाव आहे. व्यापारी संघटना, गुजराथी, मारवाडी असा मोठा समाज वर्ग त्यांच्या पाठीशी आहे. त्यामुळे प्रजापती यांनी आपल्या पक्षात दाखल व्हावे असे प्रयत्न यापूर्वी अनेक पक्षांनी केले, पण त्याला प्रजापती यांनी होकार दर्शवला नव्हता. आगामी महापालिका निवडणुकांचा विचार करता जतिन प्रजापती यांनी भाजपमध्ये प्रवेश करावा म्हणून जिल्हाध्यक्ष नंदू परब आणि सहकारी जोरदार प्रयत्न करत होते. त्यांच्या प्रयत्नांना यश आले. भाजपचा विकासाचा झंझावत पाहून प्रजापती यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचे निश्चित केले. रविवारी त्यांना जाहीर कार्यक्रमात भाजपमध्ये त्यांच्या समर्थकांसह प्रवेश देण्यात आला.

या कार्यक्रमाला माजी शहराध्यक्ष वरूण पाटील, प्रेमनाथ म्हात्रे, मंडल अध्यक्ष रितेश फडके, स्वप्निल काठे, आमित धाक्रस उपस्थित होते. भाजपने कल्याण परिसर भाजपमय करण्याच्या सूचना कार्यकर्त्यांना केल्याने शिवसेनेच्या गोटात मात्र अस्वस्थता पसरली आहे. मागील वीस वर्ष कल्याण डोंबिवली पालिकेत शिवसेना-भाजप युतीची सत्ता असली तरी पालिकेवर आपली हुकमत ठेवण्यात शिंदे शिवसेनेने बाजी मारली होती. त्यामुळे येत्या काळात शिवसेना-भाजपमध्ये पालिकेतील सत्तेसाठी जोरदार रस्सीखेच होण्याची चिन्हे आहेत.



थोडक्यात महत्वाचे

## कोकण वसाहत पुर्नविकासासाठी माजी आमदार नरेंद्र पवार यांचे आमरण उपोषण




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : सुमारे चौदा वर्षे उलटूनही कल्याण पश्चिमेतील कोकण वसाहतीमधील नागरिकांची पुनर्विकास प्रकल्प पूर्ण न झाल्याने फरफट सुरू असून हा प्रकल्प रखडण्यास कारणीभूत असलेल्या विकासकावर गुन्हे दाखल करण्याचा मागणीसाठी आणि रहिवाशांना हक्काची घरे मिळावी यासाठी कल्याण पश्चिमचे भाजपाचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी या बाधित नागरिकांसह कल्याणच्या पोलीस उपायुक्त कार्यालयाबाहेर आमरण उपोषण सुरू केले आहे.

कल्याण पश्चिमेतील बिर्ला कॉलेज, परिसरात कोकण वसाहत माध्यमातून आर्थिक दृष्ट्या मागास उत्पन्न गट, मध्यम वर्गीय,उत्पन्न गट, उच्चतम उत्पन्न गट या गटवरीनुसार लोकांनी म्हाडा अंतर्गत घरे 35 वर्षापूर्वी घेतली. सुमारे 14 वर्षापूर्वी पुर्नविकासाच्या नावाखाली दोन वेगवेगळ्या विकासकांनी कोकण वसाहतीतील पुर्नवसन बाधित सदनिका धारकांना वाढीवक्षेत्रासह बहुमजली इमारतीत सदनिका, तसेच सदनिका पूर्ण होण्याच्या कालावधीपर्यंत घरभाडे देणार असे सागितले होते. मात्र सुमारे 14 वर्षे होऊन देखील घर भाडे पण नाही घर देखील नाही आणि आपली फरफट होत असून काहीना आपल्या कुटंबाचा गाडा हाकताना आपले हक्काचे घर मिळत नसल्याने घरभाडे भरण्याचा आर्थिक बोजा पडत आहे.

याबाबत भाजपाचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी शांतीदूत सोसयटी माध्यामातून म्हाडा पूर्नवसन प्रकल्पा संदर्भात प्रश्न विधानसभेत लक्षवेधी आमदार योगेश टिळेकर यांच्या माध्यामातून मांडत या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधले आणि बाधित सदनिका धारकांचा प्रश्न ऐरणीवर आणला. त्यांना हक्काची घरे, न्याय मिळवून देण्यासाठी सुमारे 1600 पुर्नविकास प्रकल्प बाधित सदनिका धारकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत पोलीस उपायुक्त कार्यालया लगत आमरण उपोषण सुरू रविवारी सकाळ पासून सुरू केले.

या उपोषणास प्रचंड प्रतिसाद लाभला असून समाजातील सर्वच वर्गातून त्यांना पाठिंबा मिळत आहे. शनिवारी शिंदे गट शिवसेनेचे आमदार विश्वनाथन भोईर आणि भाजपा माजी आमदार नरेंद्र पवार, यांच्या मध्ये आरोप प्रत्यारोपाचा कलगीतुरा रंगला. यात विश्वनाथ भोईर यांनी बाधितांना घरे मिळण्यासाठी आम्ही देखील नगरविकास मंत्र्यांच्या माध्यमातून हा प्रश्न लावून धरला आहे. विकासकाला ५ महिन्यांची मिळालेल्या मुदतीची वाट पाहणे हे देखील महत्त्वाचे असून पुनर्वसन प्रकल्प बाधितांना हक्काची घरे मिळालीच पाहिजेत. माजी आमदार नरेंद्र पवार यांनी सद्यस्थितीत आमरण उपोषण करणे योग्य नाही असा आरोप केला.

माजी आमदार पवार यांनी 14 वर्षांपासून पुर्नविकास प्रकल्प रखडला आहे. बाधितांना घरे मिळत नाही. स्थानिक लोक प्रतिनिधी करतात काय?असा सवाल करीत तुम्ही बाधितांच्या बाजूने की, विकासकाच्या बाजूने असा टोला लागवत आमरण उपोषण करणार असे प्रसिद्धी माध्यमांना सागितले. आज उपोषण स्थळी बिर्ला कॉलेज प्रभागाच्या माजी लोक प्रतिनिधी छाया वाघमारे यांनी फोनवरून आम्ही तुमच्या बरोबर असल्याचे पवारांना सागितले. सामाजिक कार्यकर्त्या राणी कोपोते यांनी देखील उपोषणात येत पाठिंबा दिला.

पुर्नविकास करणार्या विकासकांनी पुर्नविकास प्रकल्प बाधितांना घरभाडे, घरे वेळेत देत नसल्याने गुन्हे दाखल करण्याची मागणी देखील पवार यांनी यानिमित्ताने जोर धरली आहे.

तर दरम्यान विकासकाच्या वतीने जमलेल्यां पैकी एका महिलेने पत्रकाराला शिवीगाळ केल्याने पत्रकारांनी या घटनेचा निषेध केला. परंतु एकंदरीत चित्र पाहता दिशाहीन झालेल्या पुर्नविकास प्रकल्प बाधित सदनिका धारकांच्या हक्काचे घर मिळवून देण्यासाठी शिवसेना की, भाजपा ताराणहार ठरते हे आगमी काही दिवसात दिसेल असे चित्र यानिमित्ताने दिसत आहे.

# बदलापुरात थरार...

## ब्रेक फेल ट्रकने चार गाड्यांना चिरडले

### एका महिलेचा मृत्यू :: सात जण जखमी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापुरात आज सकाळी थरारक घटना घडली. ब्रेक फेल झाल्याने गुजरातहून लाद्या घेऊन आलेल्या भरधाव ट्रकने शहरात हाहाकार उडवत चार गाड्यांना चिरडले. या भयंकर घटनेत दुचाकीवरील महिला ठार झाली असून अन्य वाहनांमधील सात प्रवासी जखमी झाले आहेत. यातील तिघांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना डोंबिवलीच्या एम्स रुग्णालयात दाखल केले आहे. दरम्यान नियंत्रण सुटलेल्या ट्रकमधून उडी मारून चालक फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. धडकी भरवणारी ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीत कैद झाली आहे.

ब्रेक फेल झालेला ट्रक गुजरातहून लाद्या घेऊन येत होता. मुरबाड येथे जात असतानाच या ट्रकचे बदलापूर शहरातील वालिवली येथे उतारावर अचानक ब्रेक फेल झाला. ब्रेक फेल झाल्याचे समजताच चालकाने गाडीतून उडी मारून पोबारा केला. त्यामुळे अनियंत्रित झालेल्या या सुसाट ट्रकने रिक्षा, दुचाकी, दोन कार अशा चार वाहनांना एकापाठोपाठ एक उडवले. हा सर्व भयंकर प्रकार पाहून रस्त्यावरून चालणाऱ्या अनेकांनी आरडाओरडा करत पळ काढला. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. मात्र ट्रकखाली छुटनीट आल्याने लालतीदेवी प्रजापती या महिलेचा जागीच मृत्यू झाला.

रिक्षाला धडक दिल्याने तिचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. दुचाकीला ठोकर देऊन दोन कारवर ट्रक आदळला. एका खासगी गृहसंकुलाच्या पुढे जाऊन ट्रक थांबला. तेव्हा अनेकांचा जीव भांड्यात पडला. अपघाताची माहिती मिळताच वाहतूक पोलीस, स्थानिक पोलीस आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमींना रुग्णालयात दाखल केले. अपघातानंतर एक तास हा मार्ग वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला होता.

आज आणि उद्या

# शहापूर तालुक्यातील रेशन दुकानांची झाडाझडती

### मंडळ अधिकारी , तलाठी देणार दुकानांना भेटी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ता. ३ : तालुक्यातील सर्व रास्त भाव धान्य दुकानदारांनी सोमवार व मंगळवारी या दोन दिवशी आपली दुकाने सुरू ठेवून प्रलबित ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी, असा आदेश शहापूरचे तहसीलदार परमेश्वर कासुळे यांनी दिला आहे. या दिवशी मंडळ अधिकारी व तलाठी संबधित दुकानांना भेटी देऊन केवायसीच्या कामांची पाहणी करतील. सार्वजनिक वितरण व्यवस्था प्रणालीमध्ये सुधारणा करण्यासाठी; तसेच त्या अनुषंगाने राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी १०० टक्के ई-केवायसी प्रामाणिकीकरण होणे आवश्यक आहे. परंतु, ई-केवायसी प्रक्रियेबाबतचा ऑनलाइन अहवाल पाहता तालुक्यातील बहुसंख्य दुकानदाराने वारंवार सूचना देऊनही ई-केवायसीचे काम पूर्ण केलेले नाही. तहसीलदार परमेश्वर कासुळे यांनी याप्रकरणाची गांभीर्याने नोंद घेतली असून, सर्व कार्डधारकांना ई-केवायसी पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे. याबाबत पुरवठा निरीक्षण अधिकारी डॉ. अमृता सूर्यवंशी, पुरवठा निरीक्षक गीतांजली गोरे आणि पुरवठा शाखेतील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही सतत पाठपुरावा सुरू ठेवला आहे. याशिवाय, सोमवार (ता. ४) आणि मंगळवारी (ता. ५) या दिवशी दुकानदाराने पूर्णवेळ रास्त भाव धान्य दुकान सुरू ठेवण्याचे आदेश तहसीलदारांनी दिले आहेत.

# आधी शिक्षक चाखणार, नंतर विद्यार्थी खाणार

## माध्यान्ह भोजनाबाबत शासनाच्या नव्या मार्गदर्शक सूचना

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : शाळांमध्ये दिल्या जाणाऱ्या माध्यान्ह भोजनामुळे वाढलेले अन्न विषबाधेचे प्रकार लक्षात घेऊन शिक्षण विभागाने यासंदर्भात कडक मार्गदर्शक सूचना (एसओपी) लागू करण्याचा निर्णय शुक्रवारी घेतला. त्यानुसार शाळास्तरावर आहार तयार केल्यानंतर तो विद्यार्थ्यांना वितरित करण्याच्या अर्धा तास आधी मुख्याध्यापक, शिक्षक अथवा स्वयंपाकी मदतनीस तसेच पालक उपस्थित असल्यास त्यांच्यामार्फत चव घेण्यात यावी व दर्जा तपासावा आणि तसा अभिप्राय नोंदवहीत नोंदवण्यात यावा, अशा सूचना शिक्षण विभागाने जारी केलेल्या निर्णयानुसार दिल्या आहेत.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शिक्षण विभागाकडून विविध उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यापैकी कडक मार्गदर्शन लागू केले आहे. शासनाच्या निर्णयामुळे पालकांसह विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. शाळांमधील अन्न पुरवठा, आहाराची स्वच्छता, अन्न साठवणूक, स्वयंपाकाच्या सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयक सुरक्षेची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. शासनाच्या आदेशानुसार शाळेत अन्न विषबाधेची घटना घडल्यास जबाबदार घटकांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. त्यासाठी शालेय शिक्षण विभागाने संबंधित मुख्याध्यापक, शिक्षक, स्वयंपाकी, आरोग्य अधिकारी आणि अन्न व औषध प्रशासन यांना विशिष्ट कार्य जबाबदाऱ्या नेमून दिल्या आहेत.



**शाळेमधील माध्यान्ह भोजनाच्या सेवनानंतर विद्यार्थ्यांना उलटी आणि मळमळ होत असल्याच्या विविध घटना समोर येताना दिसतात. या घटना लक्षात घेऊन शिक्षण विभागाने या संदर्भात कडक मार्गदर्शक सूचना (एसओपी) लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.**

**या आहेत मार्गदर्शक सूचना**

- शाळांमध्ये वितरित अन्नाची गुणवत्ता तपासणे व नमुने २४ तास ठेवणे बंधनकारक.
- विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या जेवणाची चव आधी शिक्षक / स्वयंपाकी / पालक तपासणार.
- अन्नधान्य, मसाले इ. साहित्य 'एक वर्ष शिल्लक मुदतीचे' असणे आवश्यक.
- हात स्वच्छ धुऊनच अन्न हाताळणे, साबण, स्वच्छ पाणी उपलब्ध असणे बंधनकारक.
- जेवणानंतर उलटी, जुलाब, ताप इ. लक्षणे दिसली तर तत्काळ आरोग्य केंद्राशी संपर्क साधणे.
- पुरवठादारांकडून आलेल्या धान्याची गुणवत्ता चाचण्या करून नष्ट करणे किंवा दंडाची तरतूद जिल्हास्तरावर
- दर महिन्याला नमुन्यांची प्रयोगशाळा तपासणी

# महामंडळाकडून कल्याण, विठ्ठलवाडी आगारांची पाहणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. ३ (बातमीदार)**

कल्याण व विठ्ठलवाडी एसटी आगार तसेच या आगाराअंतर्गत येणाऱ्या डोंबिवली व बदलापूर एसटीस्थानकांचे नुकतेच एसटी महामंडळाने सर्वेक्षण केले. तसेच तेथील परिस्थिती पाहून त्यांचे मूल्यांकन केले. विठ्ठलवाडी एसटी आगारातील दुरवस्थेसंदर्भात या अगोदरही सकाळने वृत्त दिले होते. त्यानंतर आता अधिकाऱ्यांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानअंतर्गत या दोन्ही आगारांच्या परिस्थितीची पाहणी केली आहे.

महाराष्ट्र राज्यमार्ग परिवहन महामंडळाच्या संकल्पनेनुसार या योजनेचे मुख्य उद्दिष्ट राज्यातील सर्व एसटी आगार तसेच बसस्थानक परिसर स्वच्छ, सुंदर व दर्जेदार ठेवणे व प्रवाशांना उत्तम सेवा देणे हे आहे. सर्व बसस्थानकांचे शहरी 'अ', निमशहरी 'ब' आणि ग्रामीण 'क' अशा तीन गटांमध्ये वर्गीकरण केले आहे. वर्गवारीनुसार बसस्थानकांवर झाडू, ब्रश, ॲसिड, फिनेल, शांपू, कचरा टोपल्या, इ. साहित्य पुरवण्यासाठी वर्गानुसार निधी दिला जातो. प्रत्येक बसस्थानकाचे नियमितपणे मूल्यांकन होत असून, उत्तम कार्य करणाऱ्या आगारांना मोठ्या प्रमाणात रोख बक्षिसे दिली जाणार आहेत.

स्थानकांवरील स्वच्छता, शौचालये, प्रवाशांसाठीच्या आसन व्यवस्था, कर्मचाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधा या सर्व बाबी विचारात घेतल्या जातात. कल्याण एसटी आगाराची नव्याने उभारणी केली जाणार असून, विठ्ठलवाडी एसटी आगारही नूतनीकरणाच्या मार्गावर आहे. त्यामुळे तूर्तास या दोन्ही आगारांना चांगले मूल्यांकन मिळणे जिकिरीचे आहे. असे असले तरी आगारात आवश्यक सोयीसुविधा मिळणे गरजेचे असल्याचे प्रवाशांकडून नमूद केले आहे. त्याचबरोबर एसटी बसेस नियमितपणे सोडण्यात याव्यात, अशाही सूचना प्रवाशांनी केलेल्या आहेत.










## वाचक मनोगत

# किशोर कुमार - चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न

हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया व्यक्तिमत्त्व असलेले किशोर कुमार यांचा आज जन्मदिन. किशोर कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न आहे. चित्रपट निर्मितीतील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात त्यांचा सहभाग नाही. पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक असे चित्रपट निर्मितीतील सर्वच प्रकारात त्यांनी मुक्त विहार केला. किशोर कुमार यांचे मूळ नाव आभास कुमार गांगुली असे होते. ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांचे वडील ुकंजलाल गांगुली हे वकील होते तर आई गौरादेवी या गृहिणी होत्या. त्यांचे थोरले बंधू अशोक कुमार आणि अनुप कुमार हे दोघेही हिंदी चित्रपट सृष्टीत नायक म्हणून कार्यरत होते. किशोर कुमार हे देखील आपल्या भावांप्रमाणे चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडत होते. १९५० साली ुकंजलाल गांगुली यांनी किशोर कुमार यांना मुक्कदर या चित्रपटात काम दिले. १९५२ ते १९६० या दरम्यान किशोर कुमार यांनी बऱ्याच चित्रपटात काम केले. नोकरी, अधिकार, धोबी डॉक्टर, ईलजाम, मिस माला, झलक हे चित्रपट त्यांनी १९५४ या एकाच वर्षात पूर्ण केले. १९५६ साली तर त्यांनी ९ चित्रपटात भूमिका केल्या. हा त्याकाळी एक विक्रम होता. त्यानंतर ते अभिनयासह गायनही करु लागले. अभिनय आणि गायन असा त्यांचा समांतर प्रवास सुरू झाला. किशोर कुमार यांनी आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन आणि संगीताचा तालावर थिरकने असा नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. किशोर कुमार यांच्या या नवीन स्टाईलने तरुणांना भुरळ घातली. त्याकाळातील सर्व दिग्गज नायिकांसोबत त्यांनी भूमिका केल्या. मधुबाला सोबत त्यांची जोडी विशेष जमली. अभिनयासोबत गायनातही ते यशस्वी होऊ लागले. त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली. किशोर कुमार यांना संगीतकार सचिन देव बर्मन यांनी अनेक संधी दिल्या. सचिन देव बर्मन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. पुढे सचिन देव बर्मन यांचे चिरंजीव राहुल देव बर्मन उर्फ पंचमदा यांच्याशी जोडी जमली या जोडीने अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट सृष्टीला दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबत त्यांनी शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांनी तीन दशकांहून आधीक काळ गायन केले. देव आनंद यांच्यापासून अनिल कपूर यांच्यापर्यंत सर्वच नायकांना त्यांनी आवाज दिला. किशोर कुमार यांचा आवाज ज्या नायकासाठी वापरला गेला तो नायक स्टार बनला. राजेश खन्ना यांना बॉलिवूडचा सुपरस्टार बनवण्यामागे किशोर कुमार यांचाही मोठा हात आहे. राजेश खन्ना यांच्या सर्व चित्रपटांमध्ये किशोर यांचाच आवाज वापरला गेला. आराधना पासून जमलेल्या या जोडीने पुढे इतिहास घडवला. या जोडीची सर्व गाणी हिट झाली. ज्या ज्या वेळी राजेश खन्ना यांचे नाव निघते त्या त्या वेळी किशोर कुमार यांचेही नाव घेतले जाते. किशोर कुमार यांनी ४०० हुन अधिक चित्रपटात शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. नायक, गायक यासोबत ते दिग्दर्शकही होते. चलती का नाम गाडी यासारख्या विनोदी चित्रपटासोबतच दूर गगन की छाव मे यासारखा गंभीर चित्रपटही त्यांनी काढला. त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिले तर काही चित्रपटांसाठी गाणीही लिहिली. किशोर कुमार यांनी चित्रपटाच्या पटकथाही लिहील्या. असा हा हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू १३ ऑक्टोबर १९८७ रोजी जगाला अलविदा करून कायमचा निघून गेला. किशोर कुमार यांच्या जादुई आवाजाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी पूर्वीइतकीच लोकप्रिय आहेत. किशोर कुमार यांनी चित्रपट सृष्टीवर असा ठसा उमटवला आहे की त्यांच्या नावाशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. किशोर कुमार यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड**

# पवार कुटुंबात पुन्हा आनंदोत्सव

## युगेंद्र पवार आणि तनिष्का कुलकर्णी यांचा साखरपुडा



**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कुटंबात पुन्हा एकदा आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. काही दिवसांपूर्वीच अजित पवार यांचे सुपुत्र जय पवार यांचा साखरपुडा मोठ्या थाटामाटात पार पडला. आता अजित पवार यांचे भाऊ श्रीनिवास पवार यांचे चिरंजीव युवा नेते युगेंद्र पवार यांचा साखरपुडा आज तनिष्का संजीव कुलकर्णी यांच्यासोबत होणार आहे.**

**हा साखरपुडा मुंबईतील प्रभादेवी येथील तनिष्का कुलकर्णी यांच्या निवासस्थानी पार पडणार आहे. या साखरपुडा समारंभाला शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार, सुप्रिया सुळे तसेच पवार कुटंबातील अनेक सदस्य आणि जवळचे मित्रपरिवार उपस्थित राहणार आहेत.**

पवार कुटुंबातील या वर्षांमधील या सलग दोन साखरपुड्यांमुळे सामाजिक आणि राजकीय वर्तुळात आनंदाचे वातावरण आहे. युगेंद्र पवार हे तरुण नेते म्हणून राजकारणात सक्रिय असून सामाजिक कार्यातही त्यांचा सक्रीय सहभाग आहे. तर तनिष्का कुलकर्णी याही शिक्षित आणि संस्कारी कुटुंबातून येत असून त्यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत दिलखुलास असल्याचे सांगितले जाते. साखरपुड्याचा सोहळा पारंपरिक पद्धतीने पण अत्यंत मोकळ्या वातावरणात पार पडणार आहे. या नवदांपत्याला पुढील आयुष्यासाठी सोशल मीडियावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

विधानसभा निवडणुकीत अजित पवारांविरुद्ध मैदानात उतरलेले त्यांचेच पुतणे युगेंद्र पवार गेल्या वर्षभरापासून राजकारणात सक्रीय झाले आहेत. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत त्यांनी शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेससाठी प्रचार केला होता. त्यामुळे, ते माध्यमांमध्ये सातत्याने चर्चेत होते. आता पुन्हा एकदा साखरपुड्याच्या निमित्ताने ते चर्चेत आले आहेत. युगेंद्र आणि तनिष्का यांचा आज साखरपुडा संपन्न झाला. मुंबईतील प्रभादेवी येथे कुलकर्णी कुटुंबीयांच्या घरी संपूर्ण पवार कुटुंबीयांच्या उपस्थितीत आणि आनंदात हा सोहळा साजरा झाला असून साखरपुड्याचे फोटो आता समोर आले आहेत. युगेंद्र आणि तनिष्का यांनी गळ्यात पुष्पहार घालून भावी आयुष्याची लगीनगाठ बांधली आहे. मात्र, युगेंद्र यांच्या सुविद्य भावी पत्नी तनिष्का कुलकर्णी कोण, असा प्रश्न सर्वांनाच पडला आहे. दरम्यान, या सोहळ्याच्या निमित्ताने पुन्हा एकदा पवार कुटुंबीय एकत्र आल्याचं पाहायला मिळालं.

अजित पवार यांचे सुपुत्र जय पवार यांचा साखरपुडा नुकताच पार पडला. या समारंभाला शरद पवार, सुप्रिया सुळे, श्रीनिवास पवार, तसेच अनेक नातेवाईक, मित्रपरिवार आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. हा खासगी समारंभ अत्यंत शिस्तबद्ध आणि पारंपरिक पद्धतीने संपन्न झाला. जय पवार हे अजित पवार आणि सुनेत्रा पवार यांचे चिरंजीव असून शिक्षणानंतर व्यवसायिक आणि सामाजिक कार्यातही त्यांचा सहभाग आहे. जय पवार यांच्या साखरपुड्यामुळे पवार कुटुंबात अनेक वर्षांनंतर असा मोठा कौटुंबिक सोहळा पार पडला असून आता लग्नाची उत्सुकता वाढली आहे. या साखरपुड्याचे फोटो आणि व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरत आहेत.

### कोण आहेत तनिष्का कुलकर्णी ?

तनिष्का कुलकर्णी ह्या मूळच्या मुंबईतील असून त्यांचे वडिल नामवंत उद्योगपती आहेत. मुंबईतील प्रभादेवी परिसरातील ते रहिवाशी आहेत. तनिष्का यांचे शालेय शिक्षण मुंबईत झाले असून उच्च शिक्षणासाठी त्यांनी विदेश गाठले होते. लंडनमधील कास बिझनेस स्कुलमध्ये त्यांनी फायनान्स क्षेत्रात आपले पदवीचे शिक्षण पूर्ण केले आहे. तनिष्का यांच्याबाबतीत सध्यातरी अधिकची माहिती सार्वजनिक नाही.

### पवार परिवारात आनंदी आनंद

राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा खासदार शरद पवार यांचे नातू युगेंद्र पवार आणि तनिष्का कुलकर्णी यांचा साखरपुडा आज पार पडला. या कौटुंबिक सोहळयासाठी शरद पवार, अजित पवार आणि सुप्रिया सुळे हे सर्वजण सहकुटुंब उपस्थित होते. पवार कुटुंबातील या नव्या पिढीच्या साखरपुड्यामुळे कुटुंबात आनंदाचे वातावरण होते. मुंबईत पार पडलेल्या या कार्यक्रमात कुटुंबातील प्रमुख सदस्य एकत्र आले होते. युगेंद्र पवार आणि तनिष्का कुलकर्णी यांच्या साखरपुड्याचे फोटो आता समोर आले आहे. यापूर्वी युगेंद्र यांच्या आत्त्या सुप्रिया सुळे यांनी याबाबत माहिती इंस्टाग्रामवरुन माहिती दिली होती. त्यानंतर, आज नियोजित कार्यक्रमात मुंबईतील तनिष्का यांच्या घरी हा साखरपुडा सोहोळा संपन्न झाला.

# भिवंडी पोलिसांच्या वतीने गणेशोत्सव मंडळांचा सन्मान

## धामणकर नाका मंडळाने पटकावले प्रथम पारितोषिक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी (शरद भसाळे)**

गणेशोत्सव साजरा करताना त्याचे पावित्र्य राखण्याची सर्वाची जबाबदारी आहे.जेथे शांतता नांदत असते तेथे प्रगती व विकास होत असतो,त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन सामाजिक एकतेचा भावनेतून सण साजरा करणे आवश्यक आहे. उत्सव साजरा करताना शासन व पोलिसांनी दिलेल्या सूचनांचे व कायद्याचे पालन करावे असे आवाहन ठाणे अतिरिक्त पोलीस आयुक्त विनायक देशमुख यांनी भिवंडीत आयोजित कार्यक्रमात केले आहे.

ठाणे पोलीस आयुक्तालय अंतर्गत पोलीस परिमंडळ - 2 भिवंडी यांच्यावतीने गणेशोत्सव 2024 मध्ये राष्ट्रीय एकात्मता जातीय सलोखा शांतता राखून व शिस्तबद्ध पद्धतीने संपन्न केलेल्या गणेशोत्सव मंडळाना पारितोषिक वितरण समारंभ भिवंडी शहरातील अंजुरफाटा येथील ओसवाल हायस्कूल सभागृहात आयोजित करण्यात आला होता.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ठाणे



अतिरिक्त पोलिस आयुक्त विनायक देशमुख उपस्थित होते.प्रसंगी पोलीस उपाआयुक्त शशिकांत बारोटे,सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन सांगळे,गणेश महामंडळ अध्यक्ष मदन भोई व सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक उपस्थित होते.भिवंडी शहरात नेहमी सामाजिक सलोखा ठेवून धार्मिक सण साजरे होत असतात त्यामुळे सर्वानी एकात्मतेच्या वातावरणात सण साजरा करावा असे आवाहन अतिरिक्त पोलीस आयुक्त देशमुख यांनी केले.गणेशोत्सव सणाला सुरुवात होणार आहे मात्र आजही रस्त्यांवर खड्डे पडून दुरावस्था झाली आहे. सर्वत्र अस्वच्छता आहे महापालिका आयुक्त प्रशासनाने तातडीने दखल घेऊन खराब रस्ते दुरुस्त करावे व विशेष स्वच्छता मोहीम सुरू करावी, विसर्जन स्थळ दुरूस्त करावेत

अशा विविध मागण्या गणेश महामंडळाचे अध्यक्ष मदन भोई यांनी केली कार्यक्रमाचे प्रास्ताविक भिवंडी पोलीस उपाआयुक्त शशिकांत बोराटे केले.

यावेळी धामणकर नाका सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ (प्रथम पारितोषिक ) बाळ गोपाळ मित्र मंडळ,(साई प्रसन्न सोसायटी) व स्वामी समर्थ गणेशोत्सव मंडळ (द्वितीय ) रामेश्वर मित्र मंडळ व गणेश मित्र मंडळ (तृतीय पारितोषिक) स्व.पंडित नाना मित्र मंडळ(विशेष उल्लेखनीय पारितोषिक) शिवशक्ती मित्र मंडळ, संयुक्त मित्र मंडळ,भावना ऋषी बाळ गोपाळ मित्र मंडळ, जय भारत मित्र मंडळ या गणेशोत्सव मंडळांना विशेष पारितोषिक तर जय दुर्गा मित्र मंडळ नवभारत तरुण मित्र मंडळ न्यू जय हिंद मित्र मंडळ राम रहीम गणेशोत्सव मंडळ समर्थ तरुण मित्र मंडळ हनुमान मंदिर मित्र मंडळ तरुण मित्र मंडळ कुंभाराळी जय हिंद मित्र मंडळ सोमवंशीय सहस्त्र अर्जुन क्षत्रिय समाज मंडळ नवजीवन चॅरिटेबल ट्रस्ट तेलगू युवक मित्र मंडळ गणपती मंदिर प्रभुवाळी वक्रतुंड मंडळ सार्वजनिक गणेशोत्सव नवी पोलीस वसाहत पोलीस संकुल छत्रपती मराठा मंडळ ओम साई दुर्गेश पार्क उत्सव समिती मंडळ शिवछत्रपती गणेश मंडळ तरुण मित्र मंडळ शिवाजीनगर खडक गणेशोत्सव मंडळ विनायक मित्र मंडळ श्री गणेश मित्र मंडळ शिवशक्ती मित्र मंडळ नारपोली मोरया मंडळ पिंपळास

**पाच दिवसीय सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ मुरलीधर मंदिर गणेशोत्सव मंडळ, संत नामदेव गणेश उत्सव मंडळ, गणपती मंदिर उत्सव मंडळ अदि मंडळाना सन्मानचिन्ह ट्रॉफी, प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.**

**निरीक्षण मंडळाचे प्रमुख सदस्य सुमित्रा कांबळे,ॲड,नियाज मोमीन, गोपाल सिंह ठाकुर,जगदीशकुमार पाठारे, शरद भसाळे मधुकर गायकवाड,अब्दुल लतीफ शेख,श्रीराम पाटील यांचा सुद्धा यावेळी पाहुण्यांचा हस्ते सन्मानचिन्ह प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.**

कार्यक्रम सुत्रसंचालन शैलेश मांजरेकर तर आभार प्रदर्शन सहाय्यक पोलीस आयुक्त सचिन सांगळे यांनी केले.सदर कार्यक्रमास गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी,सदस्य व नागरिकांनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती.

# शाळकरी चिमुरडीवर भटक्या कुत्र्यांचा हल्ला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : गेल्या काही महिन्यांपासून उल्हासनगर मध्ये भटक्या कुत्र्यांचा उच्छाद मोठ्या प्रमाणात वाढलाय. ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांवर या कुत्र्यांचे हल्ले वाढले आहेत. उल्हासनगर पाच मधील एका महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी गुरुनानक बाजारातून जात असताना या भटक्या कुत्र्यांनी तिच्यावर हल्लाबोल केला. मात्र वेळीच प्रसंगावधान साधत शेजारच्या नागरिकांनी तिचा बचाव केल्याने थोडक्यात निभावलं. नाहीतर कदाचित मोठा अप्रिय प्रसंग ओढावला असता.

उल्हासनगर कॅम्प नंबर पाच मधील खाऊन मार्केट इथून एक लहान विद्यार्थीनी पायी घरी जात असतांना भटक्या कुत्र्यांनी तिच्यावर भुंकता भुंकता पाठलाग करत तिचा चावा घेण्याचा प्रयत्न केला. ती चिमुकली जीवाच्या आकांताने पळत असताना देखील कुत्र्यांनी तिची ओढणी पकडून तिला पाडण्याचा प्रयत्न केला . वेळीच शेजारील काही दक्ष नागरिक धावून त्यांनी या कुत्र्याला हाकलले व त्या मुलीला वाचवले.यात विद्यार्थिनी थोडक्यात बचावली. हल्ल्याची ही सगळी घटना सीसीटीव्ही कॅमेरात कैद झालीय. स्थानिक तिच्या मदतीला आले, नसते तर कदाचित भटक्या कुत्र्यांनी या लहान मुलीचे लचके तोडले असते . उल्हासनगर महानगरपालिकेने कोट्यावधी रुपये खर्च करून दोन वर्षांपूर्वी श्वान निर्बिजीकरण केंद्र उघडले होते. मात्र या भटक्या कुत्र्यांच्या अशा हल्ला करण्याच्या घटना सातत्याने वाढत असल्याने हे केंद्र निरूपयोगी ठरल्याचे सिद्ध होत आहे. याबाबत वैद्यकीय अधिकारी डॉ. मोहिनी धर्मा यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता , त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

# रायगड जिल्ह्यातील आरोग्य व शैक्षणिक सुविधा वाढविण्यासाठी शासन प्रयत्नशील - उपमुख्यमंत्री अजित पवार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : रायगड जिल्ह्यातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य आणि शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याकरीता राज्यशासन प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज येथे केले.

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या श्रीमती गीता दत्तात्रय तटकरे कॉलेज ऑफ नर्सिंग चा नामकरण व उद्घाटन सोहळा प्रसंगी ते बोलत होते. यावेळी महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे,माजी आमदार अनिकेत तटकरे, माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड.राजीव साबळे उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, माणगाव येथील पवित्र भूमीत माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाची एक अद्यावत अशी नर्सिंग कॉलेजची इमारत उभी झाली आणि त्याचे उद्घाटन करण्याचे भाग्य मला लाभले. माणगाव तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थी विद्यार्थ्यांसाठी एक शिक्षणाचे दालन उभे झाले आहे येथे शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिकाधिक ज्ञान कसे मिळेल ते पहावे. या नर्सिंग कॉलेजला खासदार सुनील तटकरे यांच्या आईचे नाव दिले असून त्यांच्या आईच्या नावाला साजेसे काम येथून व्हावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

खासदार सुनील तटकरे म्हणाले की, रायगड जिल्ह्यात शिक्षणाचे हब सुरू व्हावे यासाठी प्रयत्न केले जात आहेत. जिल्ह्यात औद्योगिक क्षेत्रात प्रगती होत असून येथील होत असलेल्या औद्योगिकरणामध्ये कुशल कामगार स्थानिक पातळीवर तयार करता येतील यासाठी प्रयत्न केले जात आहेत. औद्योगीकरणामुळे येथील रोजगार वाढीस चालना मिळणार आहे. जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे याकरिता वेगवेगळी शिक्षणाची दालने उभी केले जात आहेत. जिल्ह्यात शिक्षण व आरोग्य सुविधासाठी लागणाऱ्या बाबींसाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला जाईल असेही खा. तटकरे यांनी सांगितले.

# आमटेम प्राथमिक शाळेत वृक्षारोपण



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण (प्रतिनिधी)**

पेण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आमटेम येथे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न करण्यात आला .या कार्यक्रमाला वडखळ वनविभाग अधिकारी विजय चंद्रात्रे, भगवान जाधव पेडवी साहेब तेजस अमोल निले आणि उषा चव्हाण केंद्राचे केंद्रप्रमुख विजय पाटील शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका सुजाता मॅडम तसेच नंदिनी मॅडम भाग्यश्री मॅडम कपाळे मॅडम मोकल सर व महेंद्र पाटील आणि सर्व विद्यार्थी यांच्या समवेत वृक्षारोपण करण्यात आलं.

प्रथम सर्वांचे स्वागत करून झाडांची माहिती देत सहशिक्षक महेंद्र पाटील यांनी सांगितले जर झाडे लावली आणि जगवली तरच आपण जगणार आहोत पृथ्वी वाचणार आहे आणि पशुपक्षी प्राणी यांचे जीवन म्हणजेच झाडे आहेत झाडांमुळे उष्णता कमी असते व पाऊस पडतो ऑक्सिजनचे प्रमाण योग्य ठेवतो अशा प्रकारे झाडे लावा झाडे जगवा या घोषणेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर वड, करंजा, चिंच ,आवळा, जांभूळ, सिताफळ अशा प्रकारची अनेक ऑक्सिजन आणि फळे देणारी झाडे लावण्यात आली.यावेळी या वृक्षारोपण कार्यक्रमात अनेकजण सहभागी झाले होते.



# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेत क्रांतिसिंह नाना पाटील जयंती साजरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे दि. १८.०२.२०२५ च्या परिपत्रकान्वये आणि महानगरपालिकेचे मा. प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा.प्र.से) यांचे निर्देशानुसार आज दिनांक ०३.०८.२०२५ रोजी क्रांतिसिंह नाना पाटील जयंती निमित्त महानगरपालिका मुख्यालयात तळ मजल्यावर श्री. फैसल तातली, विभागप्रमुख आरोग्य विभाग यांचे हस्ते क्रांतिसिंह नाना पाटील यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थीत होते.

# खर्डी येथे श्रीकृष्ण कथेचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर,ता.3 (वार्ताहर)**

श्री विठ्ठल रुक्मिणी महिला भजनी मंडळ,खर्डी व जिजाऊ संघटना शहापूर तालुक्याच्या वतीने 5 ऑगस्ट ते 10ऑगस्ट रोजी हभप योगेश महाराज घरत यांच्या मधुर वाणीत खर्डी गावातील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात रोज संध्याकाळी 6 ते 9 वाजे दरम्यान आयोजित केले आहे. या श्रीकृष्ण कथेत कृष्ण जन्म,कृष्ण लीला, गोपी गीत, रासलीला, कृष्ण विवाह, विदुर संवाद व सुदाम चरित्र अशी कृष्ण कथा होणार असून भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन जिजाऊ संस्थेचे खर्डी विभाग अध्यक्ष व धामणी ग्राप माजी सरपंच अशोक वीर यांनी केले आहे.



**सोमवार**

**०४ ऑगस्ट २०२५**

| मेष | वृषभ | मिथुन | कर्क |
|---|---|---|---|
| दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. या राशीच्या अभियंत्यांसाठी दिवस चांगला जाणार आहे. | योग्य दिशेने कठोर परिश्रम केल्यास विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरमध्ये यश मिळेल. थकवा जाणवेल. | आज व्यवसायात अपेक्षेपेक्षा जास्त फायदा होणार आहे . दिवस खूपच आनंदाचा जाणार आहे. | कार्यालयात अधिकारी तुमच्या कामावर खुश राहतील. तुमच्या आवडीच्या लोकांच्या भेटी होतील. |
| **सिंह** | **कन्या** | **तूळ** | **वृश्चिक** |
| प्रॉपर्टीशी संबंधित लोकांना फायदा होईल. आज अचानक आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. | आज तुम्हाला ऑफिसमध्ये एक नवीन प्रोजेक्ट मिळेल, जो तुम्ही पूर्ण करण्यात यशस्वी व्हाल. | मुलांकडून काही चांगली बातमी मिळेल. विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला जाणार आहे. | कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील. तुम्हाला तुमच्या कामाच्या ठिकाणी लक्षणीय दैदिप्यमान यश मिळेल. |
| **धनु** | **मकर** | **कुम्भ** | **मीन** |
| तुम्ही गंभीर बाबी शांततेने आणि संवादाने सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. थोडे भावूकही होऊ शकता. | घाईघाईने कोणताही निर्णय न घेणे चांगले. दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. प्रसन्नता जाणवेल. | व्यवसायानिमित्त प्रवास करावा लागेल. आज तुमचा दिवस संमिश्र जाणार आहे. संकोच करु नका. | पालकांचा सल्ला तुमच्यासाठी उपयुक्त ठरेल. तुमच्या मुलाच्या यशाने तुम्ही आनंदी व्हाल. |

### ०४ ऑगस्ट दिनविशेष

१९५६ : भाभा अणुशक्ती केंद्र तुर्भे येथे अप्सरा ही भारताची सहावी अणुभट्टी कार्यान्वित झाली.

२००७ : नासा चे फिनिक्स हे अंतराळ यान प्रक्षेपित कण्यात आले.

१५२२ : मेवाड देशाचे राजा उदयसिंग दुसरे यांचा जन्म

२००६ : भारतीय लेखक व राजकारणी नंदिनी सत्पथी यांचे निधन

२०२० : महाराष्ट्राचे १०वे मुख्यमंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर यांचे निधन



# निवडणूका जवळ आल्यावरच मुंबई तोडण्याची भाषा

## – एकनाथ शिंदे यांची ठाकरेंवर टीका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

निवडणूका जवळ आल्यानंतर मुंबई तोडणार अशी आवई केली जाते. हे आता मुंबईकरांच्या अंगवळणी पडले आहे. परंतु कोणाच्या सात पिढ्या जरी खाली आल्या तरी कोणाचा बाप मुंबईपासून महाराष्ट्र तोडू शकत नाही. अशी टीका उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केली. मुंबईतून बाहेर फेकले गेलेल्यांना पुन्हा मुंबईत आम्हाला आणायचे आमचे स्वप्न असल्याचेही ते म्हणाले. मुंबईतील माजी नगरसेवक रामदास कांबळे यांनी रविवारी शिवसेना शिंदे गटामध्ये प्रवेश केला. ठाण्यातील टेंभीनाका येथील आनंदाश्रमात पक्ष प्रवेश पार पडला. त्यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. मी मुख्यमंत्री असताना सर्वप्रथम मुंबई खड्डे मुक्त करण्याचा संकल्प केला. मुंबईतील सर्व रस्ते काँक्रीटचे केले जात आहेत. मुंबईच्या सुशोभिकरणाची कामे केली. आम्ही अनेक निर्णय घेतले. त्यामुळे काही जणांची दुकाने बंद झाली. काहीजण दरवर्षी रस्त्यांची दुरुस्ती करत होते. आता काँक्रीटचे रस्ते झाल्यामुळे २०-२५ वर्ष रस्त्यांना काही होणार नाही असे शिंदे म्हणाले.

निवडणूका आल्यावर मुंबईकरांची आठवण आम्ही करत नाही. निवडणूका जवळ आल्यानंतर मुंबई तोडणार अशी आवई होते. हे आता मुंबईकरांच्या अंगवळणी पडले आहे. परंतु कोणाच्या सात पिढ्या जरी खाली आल्या तरी कोणाचा बाप मुंबईपासून महाराष्ट्र तोडू शकत नाही. मुंबई आर्थिक राजधानी आहे. मुंबईला सोन्याची अंडी देणारी कोंबडी काहीजण समजत होते. परंतु निवडणूकांमध्ये जनतेने त्यांना त्यांची जागा दाखविली आहे अशी टीका एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंवर केली.

**“ आम्ही जनतेसाठी कामे केली. आम्ही आरोपांना आरोपांनी नाही तर कामाने उत्तर देतो. विधानसभा निवडणूकीत आम्ही ८० जागा लढलो. त्यापैकी ६० जागा जिंकले. पण ते १०० लढून २० जागा जिंकले. जे काम करतात. त्यांना लोकांनी आशिर्वाद दिला. पण जे घरी बसतात. त्यांना घरी बसविले**

**- एकनाथ शिंदे**



### महायुतीत निवडणूका लढणार

शिवसेनेत माजी नगरसेवकांची संख्या १२४ झाली आहे. आम्ही महायुती म्हणून निवडणूका लढविणार आहोत. लोकसभा आणि विधानसभा निवडणूका महायुती जिंकली. त्याप्रमाणे, महापालिका, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका देखील महायुती जिंकणार असा दावा शिंदे यांनी केला. महायुतीकडून विकासाचे काम सुरू आहे. त्यामुळे पक्ष प्रवेश होत असल्याचेही त्यांनी सांगितले.



# बस स्थानकातील खड्डे भरून गांधीगिरी

# एसटी खाजगीकरणाला ठाणे काँग्रेसचा विरोध

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : राज्य परिवहन उपक्रमाच्या (एसटी) बस स्थानकाची दुरावस्था झाली आहे. त्याचा फटका स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना बसत असतानाच, एसटी महामंडळाच्या जागा ९९ वर्षाच्या कराराने भाडेतत्त्वावर देऊन शासनाचा खाजगीकरण करण्याचा डाव असल्याचा आरोप काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी केला आहे. या खासगीकरणाविरोधात ठाण्यातील काँग्रेसच्या नेत्यांनी रस्त्यावर उतरून एसटी स्थानकातील खड्डे बुजवले.

राज्य परिवहन उपक्रमाच्या बसगाड्या राज्यातील विविध मार्गांवर चालविण्यात येतात. या बसगाड्यांमधून अनेक प्रवासी प्रवास करतात. या प्रवाशांची संख्या मोठी आहे. राज्य परिवहन उपक्रमाचे राज्यात अनेक बस थांबे आहेत तर, अनेक ठिकाणी बस आगार आहेत. त्यापैकी काही बस आगारांची दुरावस्था झाली असून त्याचा फटका स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना बसत आहे. असे असतानाच, एसटी महामंडळाच्या जागा ९९ वर्षाच्या कराराने भाडेतत्त्वावर देऊन शासनाचा खाजगीकरण करण्याचा डाव असल्याचा आरोप काँग्रेस पक्षाच्या नेत्यांनी केला आहे.

राज्य शासनाचा हा डाव उधळून लावण्यासाठी, आणि बस स्थानकांच्या व्यवस्थेत सुधारणा होण्यासाठी, ठाणे काँग्रेसतर्फे शनिवारी ठाणे पश्चिम स्थानकाजवळील बसआगारात आंदोलन करण्यात आले. याप्रसंगी ठाणे काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते राहुल पिंगळे, हिंदुराव गळवे यांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. एसटी महामंडळ त्यांच्या बसस्थानकांना सार्वजनिक, खाजगी भागीदारी मॉडेल अंतर्गत दीर्घ मुदतीच्या कालावधीसाठी भाडेतत्त्वावर देऊन खाजगीकरणाचा प्रयत्न करत आहे. यावेळी एसटीचे खासगीकरण बंद करा, एसटीच्या मोक्याच्या जागा हडप करू नका, अशा घोषणा आंदोलनकर्त्यांनी दिल्या.

### आगारातील रस्त्यांवर खड्डे भरणी

एसटी आगार खाजगीकरणासह आगारातील खड्ड्यांचे साम्राज्य, स्वच्छता गृहांची दुरावस्था, बसण्यासाठी योग्य व्यवस्था नसणे, महामंडळांच्या कार्यालयाची दुरावस्था याकडे ठाणे काँग्रेसचे अध्यक्ष विक्रांत चव्हाण यांनी एसटी प्रशासनाचे लक्ष वेधले. यावेळी काँग्रेस कार्यकर्त्यांनी सिमेंट मिक्सर वाहने आणून काँक्रीटद्वारे आगारातील खड्डे बुजविले. यावेळी चव्हाण म्हणाले, " ठाणे आगाराची अत्यंत दुरावस्था झाली आहे. आतापर्यंत शहरात कोट्यावधी रुपये काँक्रिटीकरण आणि डांबरीकरणावर खर्च करण्यात आले. परंतु शहरातील बस स्थानक दुर्लक्षित का, तसेच एसटी स्थानके भाडेतत्वावर देत खाजगीकरणासाठी पुढाकार घेणारे ठाण्याचे परिवहन मंत्री त्यांच्याच शहरात एसटी प्रवाशांना मूलभूत सोयी सुविधा पुरवू शकत नाही, ही खेदाची बाब आहे."

## मिरा-भाईंदर वसई-विरार

# पोलीस मुख्यालयासाठी २८ कोटींचा निधी मंजूर



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदरः** मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या मुख्यालयासाठी मिरा रोड येथे आरक्षित करण्यात आलेली जागा भूसंपादित करण्यासाठी शासनाने २८ कोटींचा निधी मंजूर केला आहे. त्यामुळे पोलीस आयुक्तालयाची इमारत उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाची स्थापना १ ऑक्टोबर २०२० रोजी झाली असून, यास आता जवळपास पाच वर्षे पूर्ण होत आहेत. पालघर आणि ठाणे ग्रामीण पोलिसांचे विभाजन करत या स्वतंत्र आयुक्तालयाची स्थापना करण्यात आली. स्थापनेपासूनच पोलीस आयुक्तालयाच्या कार्यालयीन कामकाजासाठी इमारत उपलब्ध नसल्यामुळे, मिरा-भाईंदर महापालिकेची रामनगर येथील तात्पुरती इमारत भाड्याने घेऊन तेथे कामकाज सुरू करण्यात आले. त्यानंतर, स्वमालकीची पोलीस आयुक्तालयाची इमारत आवश्यक असल्याने, ती मिरा रोडच्या मिरागाव येथील पोलिस मुख्यालयासाठी आरक्षित ११,८१५ चौरस मीटर जागेत उभारण्याचे निश्चित करण्यात आले. या जागेतील ७,००० चौरस मीटर जागा मिरा-भाईंदर महापालिकेच्या ताब्यात असल्यामुळे, ती २०२१ साली २० कोटी रुपये अदा करून बाजारभावानुसार खरेदी करण्यात आली. उर्वरित ४,५९४ चौरस मीटर जागा खाजगी मालकीची असून, ती भूसंपादित करण्यासाठी जागेचे मूल्यांकन करून त्याचा अहवाल गृह खात्याकडे सादर करण्यात आला होता. मात्र निधी उपलब्ध नसल्यामुळे ही प्रक्रिया रखडली होती. परिणामी पोलीस आयुक्तालय उभारणीचे काम प्रशासनाला हाती घेता येत नव्हते. त्याकरिता निधी मंजुरीसाठी पोलीस आयुक्तालयाकडून गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. त्यानुसार नुकताच राज्य सरकारकडून २७ कोटी ९५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, ३० जुलै रोजी गृह विभागाकडून यासंदर्भातील आदेश जारी करण्यात आले आहेत.

# वसई विरार मनपाच्या बोगस डॉक्टर शोध मोहिमेला वेग

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

## नालासोपाऱ्यात एका बोगस डॉक्टरवर कारवाई

**वसई** : वसई विरार शहरात बोगस डॉक्टरांच्या शोध मोहिमेला वेग आला आहे. नुकताच पालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या पथकाने नालासोपाऱ्यात एका बोगस डॉक्टरवर कारवाई केली आहे. मोहम्मद नसीम खान असे बोगस डॉक्टरचे नाव असून त्याच्या विरोधात तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

मागील काही वर्षापासून शहरात विविध ठिकाणच्या भागात बोगस डॉक्टर आपले दवाखाने थाटू लागले आहेत. अशा बोगस डॉक्टरांना पायबंद घालण्यासाठी महापालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाने मोहीम हाती घेतली आहे. नुकताच नालासोपारा पूर्वेच्या भागात त्यांनी दोन पथके तयार करून तपासणी सुरू केली होती. याच दरम्यान नालासोपारा पूर्वेच्या संतोष भवन परिसरात असलेल्या "तसनीम हेल्थ केअर" या बेकायदेशीर दवाखान्यावर छापा टाकला. यावेळी डॉक्टरकडे कोणत्याही प्रकारचा परवाना नसताना एलोपॅथी उपचार करताना रंगेहात पकडण्यात आल्याचे पालिकेच्या वैद्यकीय विभागाने सांगितले आहे.

मोहम्मद नसीम खान असे या बोगस डॉक्टरचे नाव असून त्याच्याकडे केवळ बी.ई.एम.एस. (B.E.M.S.) ही पदवी आहे, तरीही तो एलोपॅथी उपचार करत होता. त्याच्या दवाखान्यातून मोठ्या प्रमाणावर एलोपॅथी औषधे, इंजेक्शन्स आणि वैद्यकीय उपकरणे जप्त करण्यात आली आहेत. याप्रकरणी पालिकेचे बिलालपाडा प्राथमिक नागरि आरोग्य केंद्राचे डॉ. शाहीन शेख यांच्या तक्रारीवरून तुळींज पोलीस ठाण्यात बोगस डॉक्टर विरोधात भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**महानगरपालिका क्षेत्रात आतापर्यंत ३१ बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली असून ही मोहीम पुढेही सुरु राहणार आहे. नागरिकांनी केवळ नोंदणीकृत आणि अधिकृत डॉक्टरांकडूनच उपचार घ्यावेत, तसेच संशयास्पद वैद्यकीय कृतीची माहिती आरोग्य विभाग किंवा पोलिसांना तात्काळ द्यावी, असे आवाहन पालिकेच्या वतीने केले जात आहे.**

**- डॉ. भक्ति चौधरी**
**मुख्य वैद्यकीय अधिकारी**

# गैरव्यवहारा विरोधात ‘एकटा शिपाई’ मैदानात !

## आण्णा साळवे यांचे स्वातंत्र्यदिनी मुरबाड तहसिल कार्यालयासमोर बेमुदत उपोषण!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :: दिलीप पवार**

मुरबाड तालुक्यातील शासकीय विभागांत वाढत चाललेल्या भ्रष्टाचार, बनावट दस्तऐवजांद्वारे मालमत्ता हस्तांतरण, वनजमिनीवरील अतिक्रमण आणि बोगस लाभार्थ्यांना वितरित शासकीय निधी यासारख्या गंभीर प्रकरणांचा पर्दाफाश करत, सामाजिक कार्यकर्ते आण्णा मोतीराम साळवे यांनी आता प्रशासनाला थेट खुला इशारा दिला आहे – "कारवाई नाही, तर तहसीलसमोर उपोषण होईल!" या मागणीसाठी त्यांनी १५ ऑगस्ट २०२५ हा दिवस निवडला आहे – जिथे एकीकडे संपूर्ण देश स्वातंत्र्यदिन साजरा करत असेल, तिथे दुसरीकडे मुरबाडमध्ये एक शिपाई ‘सत्याच्या लढ्यासाठी’ उपोषणाच्या माध्यमातून संघर्ष करणार आहे.

**काय आहेत या उपोषणामागील कारणं?**

आण्णा साळवे यांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी मागील काही महिन्यांपासून विविध शासकीय गैरप्रकारांबाबत संबंधित विभागांना तक्रारी केल्या होत्या. मात्र, अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. त्यांच्या निवेदनानुसार पुढील प्रमुख प्रकरणांमध्ये चौकशी व कारवाईची मागणी करण्यात आली आहे:

- ◆ मानिवली व शिरवली गावातील बोगस घरपट्टी घोटाळा
  – ग्रामसेवकांनी बनावट घरपट्टी दाखले तयार करून, एमआयडीसीमार्फत लाखो रुपयांची आर्थिक मदत अपात्र लोकांना दिली.
- ◆ पंचायत समितीच्या शासकीय जागेवरील अतिक्रमण
  – समितीच्या मालकीची जागा खासगी लोकांनी बळकावून अनधिकृत बांधकाम केले आहे.
- ◆ नगरपंचायतीकडून वनजमिनीवर बेकायदेशीर बांधकाम
  – खोटे अंदाजपत्रक, समाज कल्याण खात्याचा निधी वापर, आणि कोणतीही वनविभागाची परवानगी नसताना कामे केली गेली.
- ◆ मौजे आल्यानीतील बनावट फेरफार प्रकरण
  – सरकारी वनजमीन खाजगी करण्यासाठी खोटी कागदपत्रे तयार करून दस्त नोंदी केल्या गेल्या.
- ◆ देहरी येथील असंजा फार्ममध्ये बेकायदेशीर आरसीसी बांधकाम
- ◆कोणतीही परवानगी नसताना पर्यटकांसाठी कॉमर्शियल बंगल्यांचे उभारणी.
- ◆ कासगाव येथील जमिनीचे गैरवर्तन
- ◆ खोट्या फेरफारांद्वारे महसूल बुडवून जमीन हस्तांतरण, आणि दोषींवर आजतागायत कारवाई नाही.

"मी एकटा लढतोय... पण जनता माझ्या पाठिशी उभी राहील!" – आण्णा साळवे

जर प्रशासनाने १५ ऑगस्टपूर्वी या प्रकरणांची चौकशी व कारवाई केली नाही, तर मी मुरबाड तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू करेन. हे केवळ माझं लढणं नाही, तर भ्रष्ट व्यवस्थेविरुद्ध सामान्य जनतेचा आवाज आहे!" असा स्पष्ट इशारा साळवे यांनी दिला आहे

**प्रशासनाची कसोटी लागणार?**

या निवेदनामुळे मुरबाड तहसील कार्यालय आणि इतर संबंधित विभागांची चांगलीच धांदल उडाली असून, येत्या काही दिवसांत प्रशासन यावर काय पावले उचलते याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

या आंदोलनात इतर सामाजिक संस्था व जनतेचा सहभाग वाढण्याची शक्यता असून, उपोषण अधिक व्यापक रूप धारण करू शकते.

# सामाजिक संस्थांना पालिकेची जागा भाडे तत्वावर द्यावी

## वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे मागणी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई** : शहरातील साहित्य, कला, संस्कृतीसाठी धडपडणाऱ्या जुन्या संस्थांनी वाशी सेक्टर ३ येथील महात्मा जोतिबा फुले स्मृतिभवनातील जागा नवी मुंबई महानगरपालिकेने कायमस्वरुपी भाडेतत्वावर द्यावी, अशी मागणी राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे केली आहे. या संस्थांनी स्मृतिभवनातील जागा तात्काळ रिकामी करण्याचे लेखी पत्र पालिकेने दिल्यानंतर या संस्थांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे.

नवी मुंबई शहरात मागील अनेक वर्ष टाऊन लायब्ररी, नूतन महिला मंडळ, स्त्री मुक्ती संघटना, न्यू बॉम्बे म्युझिक अँड ड्रामा सर्कल, नवी मुंबई स्वयंसेवी समन्वय संस्था, नवी मुंबई स्पोर्टस क्लब, अलर्ट इंडिया या संस्थानी वनमंत्री गणेश यांना लेखी निवेदन दिले आहे. १९७५ पासून असलेले सिडको समाज मंदिर वाशी सेक्टर ३ येथे कार्यरत आहेत. आजही या संस्था महात्मा फुले स्मृतिभवन प्लॉट नंबर १२, १३ सेक्टर येथे कार्यरत आहेत.

**गेली ५० वर्षापासून नवी मुंबईत कला, साहित्य, संस्कृतीची जपणूक करणाऱ्या स्वयंसेवी संस्थाना कायम स्वरुपात भाडेतत्वावर जागा देण्यात यासाठी वनमंत्री गणेश नाईक यांना पत्रव्यवहार केला आहे. जुन्या संस्थांना या निविदा प्रक्रियेत न जाता पूर्वीप्रमाणेच भाडेतत्वावर जागा द्यावी ही मागणी केली आहे.**

**● वृषाली मगदूम, अध्यक्ष नवी मुंबई स्वयंसेवी समन्वय संस्था**

सिडकोने २००७ साली वाशी सेक्टर ३ येथील समाजमंदिर पालिकेला हस्तांतरित केले. त्यानंतर पालिकेने संस्था कार्यरत असलेल्या जागेचे नूतनीकरण केले. तेव्हा त्या ४ वर्षांच्या कालावधीत सर्व संस्थांना सेक्टर १ येथील नागरी आरोग्य केंद्रातील पहिल्या मजल्यावर भाडेतत्वावर जागा दिली होती. या ठिकाणी अपुऱ्या जागेतही या जुन्या संस्थांनी आपला कारभार नेटाने सुरू ठेवत वाचनालयासह कला, साहित्य, संस्कृती वाढवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्यानंतर पालिकेची नवी इमारत सज्ज झाल्यानंतर तत्कालिन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या कार्यकाळात महात्मा फुले स्मृती भवन या वास्तूत जागा दिली. परंतु २८ जुलै रोजी नवी मुंबई महापालिकेने आम्हा सर्व संस्थांना जागा रिकामी करण्यास सांगितले आहे.

# सुट्टीच्या दिवशीही केडीएमसीच्या मालमत्ता कर केंद्राला नागरिकांचा प्रतिसाद

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार आता महापालिका क्षेत्रातील नागरिकांना, करदात्यांना मालमत्ता व पाणीपट्टी रकमेचा भरणा करणे सोयीचे व्हावे याकरिता महापालिकेने प्रभाग क्षेत्रांतील नागरिक सुविधा केंद्रांव्यतिरिक्त सर्व प्रभागातील एकूण 18 ठिकाणी विशेष कर भरणा केंद्राची सुविधा उपलब्ध करून दिली आहे, तसेच 31 ऑगस्ट पर्यंत मालमत्ता कर भरल्यास मालमत्ता करात पाच टक्के सवलतही देण्यात आली आहे.त्यानुषंगाने काल कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी देखील १/अ,६/फ व ७/ग प्रभागातील नागरिकांनी या विशेष भरणा केंद्रात रोख रकमेच्या स्वरूपात, धनादेशाद्वारे आणि ऑनलाइन स्वरूपात रक्कम रु. 15 , 38,897 इतका भरणा केला आहे. यापैकी १/अ प्रभागात काल 7,53, 438/- इतका मालमत्ता कर व पाणीपट्टीचा भरणा नागरिकांमार्फत करण्यात आला आणि ६/फ आणि ७/ग प्रभागात रु 7,85,459/- इतका मालमत्ता व पाणीपट्टीचा भरणा करण्यात आला.आज मालमत्ता कर विभागाच्या उपायुक्त कांचन गायकवाड यांनी १/अ प्रभागातील अटाळी चौक या ठिकाणी आणि ६/फ प्रभागातील आदित्य मंगल कार्यालय परिसरात असलेल्या कर भरणा केंद्रास समक्ष भेट देऊन करवसुली प्रक्रियेची पाहणी केली, यावेळी १/ अ प्रभागाचे सहा. आयुक्त प्रमोद पाटील आणि ६/ फ आणि८/ ग प्रभागाच्या सहा. आयुक्त हेमा मुंबरकर उपस्थित होत्या.

# मानव तस्करी विरोधात आंतर-महाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कांदिवली** : ठाकूर श्यामनारायण पदवी महाविद्यालयाच्या आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग (DLLE) आणि राष्ट्रीय सेवा योजना (NSS) यांनी 30 जुलै रोजी मुंबई स्माईल एनजीओच्या सहकार्याने मानवी तस्करीबद्दल प्रभावी जनजागृती आणि पारितोषिक वितरण कार्यक्रम आयोजित केला.

माननीय स्वाती चव्हाण (माजी न्यायमूर्ती, उच्च न्यायालय) , माननीय शोभा शेलार (महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई) , माननीय मुकुल चितळे (सचिव/न्यायाधीश, DLSA) , माननीय ऋषी देशपांडे (अभिनेता आणि दिग्दर्शक) , श्री. चित्रागन कदम (निवृत्त HPCL कर्मचारी) , अ‍ॅड. शबनम काझी, श्री.सागर दवे, सुश्री रोहिणी रसाळ, मुंबई स्माइल्स यावेळी अनेक पोलीस अधिकारीही सामील झाले. सर्व मान्यवरांचे ठाकूर महाविद्यालयातर्फे स्वागत करण्यात आले.

डॉन बॉसको कॉलेज, निर्मला कॉलेज, हिंदुजा कॉलेज, जे जे स्कूल ऑफ फाईन आर्ट्स व शिवाजीराव जोंधळे कॉलेज अशा अनेक महाविद्यालयांचा सहभाग होता.

विविध स्पर्धा मध्ये रील मेकिंग, पोस्टर मेकिंग आणि डॉक्युमेंटरी मेकिंग या स्पर्धा होत्या. या आंतर-महाविद्यालयीन स्पर्धा मध्ये प्रामुख्याने ठाकूर महाविद्यालयाला घवघवीत यश मिळाले.

माहितीपट : पहिले पारितोषिक - विधी पटेल (एसवायआयटी) - भाविका पाटील (एसवायआयटी) - अथर्व काडगावकर (एसवायआयटी).

तिसरे पारितोषिक - अनंत मिश्रा

पोस्टर मेकिंग :

पहिले पारितोषिक - - शिफा काझी (FYDS).

या कार्यक्रमाने मानव तस्करीबद्दल युवा वर्गामध्ये जागरूकता, विद्यार्थ्यांची सर्जनशीलता आणि सामाजिक जबाबदारीला एका शक्तिशाली आणि सहयोगी व्यासपीठाद्वारे प्रोत्साहन दिले.

याप्रसंगी ठाकूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. डी. गिरी यांनी प्रास्ताविक केले आणि या स्तुत्य उपक्रमांबद्दल सर्व आयोजकां चे व विद्यार्थी स्पर्धकांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाला 250 हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ठाकूर कॉलेजच्या NSS विभागाचे कार्यक्रम अधिकारी डॉ. कुणाल ठाकूर, DLLE विभागाच्या समन्वयक शना शेख तसेच मुंबई Smiles NGO चे प्रोजेक्ट मॅनेजर अ‍ॅड. विकास गायकवाड आणि अनेक स्वयमसेवकांनी अथक परिश्रम घेतले.



# क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंती निमित्त कल्याण डोंबिवली महापालिकेतर्फे अभिवादन !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या जयंती दिनी महापालिका मुख्यालयात आज शिक्षण अधिकारी विजय सरकटे यांनी क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सहाय्यक माहिती व जनसंपर्क अधिकारी सुमित बोयत व इतर अधिकारी/ कर्मचारी यांनी देखील "क्रांतिसिंह नाना पाटील " यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करून अभिवादन केले.



दैनिक जीवनदीप वार्ता
ठाणे ■ सोमवार ■ ०४ ऑगस्ट २०२५
jeevandeepvartanews2020@gmail.com


# श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रांतर्गत खर्डी येथे वृक्षारोपण व नाडी परीक्षण शिबीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
शहापूर,ता.3(वार्ताहर)

श्री स्वामी समर्थ सेवा व आध्यात्मिक विकास केंद्र दिंडोरी प्रणित खर्डी येथील श्री स्वामी समर्थ सेवा केंद्रात 3 ऑगस्ट रोजी बालसंस्कार व युवा प्रबोधन विभाग अंतर्गत श्रावण मास निमित्त श्री रुद्र आवर्तन नक्षत्रवन पूजा व नाडी परीक्षण प्रश्नोत्तरे व वास्तुशास्त्र मार्गदर्शन, वृक्षारोपण सोहळ्याचे आयोजन ठाणे झोन अंतर्गत बालसंस्कार व युवा प्रबोधन विभागातर्फे करण्यात आले होते. 27 नक्षत्राप्रमाणे भक्तांच्या राशीने येणाऱ्या पिंपळ, वड आंबा, साग, औंदुबर, जांभूळ, लिंब, बेल व नारळ अश्या 240 रोपांचे वृक्षारोपण केंद्राच्या परिसरात व रस्त्याच्या कडेला मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.नाडी परीक्षण डॉ.एस.शेवाळे यांनी केले.या रोपांचे संवर्धन सेवेकरी करणार असून त्याची काळजी घेणार आहेत.यावेळी केंद्राचे अनंता खर्डीकर, रामदास सदगीर,गणेश जाधव,योगिता पाटील, विनोद राणे,राजेंद्र येवले,प्रणाली मांजरेकर, लतिका लोखंडे, गणेश पाटील,विनोद खर्डीकर, पी.चौधरी,गणेश पाटील, अनिकेत तरल,विलास बोटकोंडले यांच्यासह डोबिवली, कल्याण, टिटवाळा येथील स्वामी भक्तांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला होता.



# अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●



**कल्याण :** डोंबिवलीच्या खर्डीकर क्लासेस मध्ये अंधश्रद्धा निर्मुलन समिती कडून विद्यार्थ्यांमध्ये नुकतीच जनजागृती करण्यात आली. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक कार्याध्यक्ष डॉ.नरेंद्र दाभोळकर यांची काही समाजकंठकांनी गोळया झाडून हत्या केली होती. त्यांच्या पश्चात अंधश्रद्धा निर्मूलन समिती अजूनही त्यांचे विचार जिवंत ठेऊन समाजात जनजागृती करण्याचे कार्य करीत आहे. महाराष्ट्रात बोकाळलेली अंधश्रद्धा, थोतांड, जादू टोणा, चमत्कार, अन्याय अत्याचार, अनिष्ठ रूढी व परंपरे विरोधात आवाज उठवणाऱ्या दाभोळर यांच्या 12 व्या पुण्यतिथी निमित्त या जनजागृतीपर प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ.सुनील खर्डीकर यांच्या क्लासेसमधील विद्यार्थ्यांकरिता अंधश्रद्धा निर्मूलन समितीने वैज्ञानिक दृष्टिकोन आणि चमत्कार या विषयावर प्रात्यक्षिके करून अंधश्रद्धे विरोधात जनजागृती केली. दाभोळकर यांचे सहकारी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे प्रकाशन विभाग प्रमुख मच्छिंद्रनाथ मुंडे व त्यांच्या पत्नी राज्य प्रधान सचिव सुशीला मुंडे यांनी स्वतः उपस्थित राहून विद्यार्थ्यांना काही प्रयोग करून दाखवले. अंगात येणे, बुवाबाजी, तांत्रिक मांत्रिक, जादूटोणा अशी सर्व प्रात्यक्षिके त्यांनी विद्यार्थ्यांना करून दाखवली. हे सर्व प्रयोग पाहताना खर्डीकर क्लासेसच्या विद्यार्थ्यांनाही एक वेगळीच गोष्ट शिकावयास मिळाली.

संपूर्ण जग विज्ञानाच्या जोरावर खूप पुढे गेले आहे. पण आपल्या देशात अजूनही काही ठिकाणी अंधश्रद्धेला खतपाणी घातले जाते. याला सुशिक्षित लोकही बळी पडतात. येणारी पिढी जर अशीच अंधश्रद्धेच्या आहारी गेली तर तो देशाच्या प्रगतीसाठी अडथळाच ठरेल. लोकांना मूर्ख बनवून, घाबरवून काही लोक स्वतः पैसे कमवित आहेत. हे कुठेतरी थांबायला हवे, यासाठी येणाऱ्या पिढ्यांना जागरूक बनवणे गरजेचे आहे. म्हणूनच आम्ही विद्यार्थ्यांसाठी अशी जनजागृती केली असल्याचे डॉ.सुनील खर्डीकर यांनी सांगितले.



# मोहने येथील आगरी कोळी स्मारकाच्या सौंदर्याचे विद्रुपीकरण

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**कल्याण :** मोहने चौकात असलेले आगरी कोळी स्मारक सध्या केवळ दुर्लक्षित नाही, तर त्याभोवतीच्या परिसरात देखील पूर्ण बकालपणा पसरलेला आहे. स्मारकाच्या भिंतींवर जाहिरातींची भरमसाट चिटकवणी करण्यात आली आहे. काही फलक तर अर्धवट फाटलेले असून, स्मारकाच्या सौंदर्यावर त्याचा थेट परिणाम होत आहे.

त्याचप्रमाणे, स्मारकाच्या पायथ्याशी साचलेली घाण, अनियमित आणि अस्वच्छता यामुळे या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक ठिकाणाची प्रतिमा मलीन होत आहे. हे स्मारक केवळ कोळी समाजाचे नव्हे, तर परिसराच्या ओळखीचा एक महत्त्वाचा भाग असून, त्याचे असे विद्रुपीकरण खेदजनक आहे. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, याठिकाणी कोणतीही नियमित स्वच्छता मोहीम राबवली जात नाही. प्रकाशयोजना देखील कार्यान्वित नसल्यामुळे रात्रीच्या वेळी या स्मारकाचा परिसर अंधारात गडप होतो. नारळी पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर समाजभावनेचे प्रतीक असलेल्या या स्मारकाचे सौंदर्य आणि महत्त्व जपले गेले पाहिजे, ही स्थानिकांची मागणी जोर धरू पाहत आहे.

# 'मिशन नशामुक्त कल्याण'

## तरुणाईला अंमली पदार्थांच्या आहारी लोटण्याचा परकीय शक्तींचा डाव – समीर वानखेडे

● दै. ठाणे जीवनदीप वार्ता ●

**कल्याण :** आपला भारत देश हा महासत्ता होण्याच्या दिशेने अतिशय विश्वासाने आणि वेगाने पाऊले टाकत आहे. मात्र आपण महासत्ता होऊ नये यासाठी काही परकीय शक्तींकडून देशाचे भविष्य असलेल्या तरुण पिढीला अंमली पदार्थांच्या आहारी लोटण्याचा कट रचला जात आहे. मात्र तरुणांनी कोणत्याही नशेच्या आहारी न जाता आपल्या देशाला महासत्ता बनवण्यात मोलाचा वाटा उचलावा असे आवाहन नार्कोटिक्स कंट्रोल ब्यूरो मुंबईचे माजी संचालक आयआरएस समीर वानखेडे यांनी कल्याणात केले. येथील माजी आमदार नरेंद्र पवार आणि हेमलता पवार यांच्या पुढाकाराने कल्याण विकास फाउंडेशन तसेच ॲड. शिवानी कांबळे यांच्या यंग इंडिया कल्याण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मिशन नशामुक्त कल्याण कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाला केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल, माजी आमदार नरेंद्र पवार, कल्याण विकास फाउंडेशनच्या अध्यक्ष हेमलता पवार, यंग इंडिया कल्याणच्या ॲड. शिवानी कांबळे, श्री सदस्य यतीन चाफेकर, के. सी. गांधी शाळेचे ट्रस्टी मनोहर पालन यांच्यासह कल्याणातील ज्येष्ठ मंडळी, शालेय - महाविद्यालयीन शिक्षक आणि पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कोणत्याही प्रकारचे अंमली पदार्थ किंवा ड्रग्ज यातून केवळ आपले शारीरिक, मानसिक नुकसान होत नाहीये. तर मोठ्या दृष्टिकोनातून आपण विचार केला तर आपल्याला हे दिसून येईल की आपल्या देशावर, देशाच्या अर्थव्यवस्थेवरही त्याचे नकारात्मक परिणाम होत आहेत. आपल्या देशातील एकूण लोकसंख्येच्या 20 टक्के जनता ही तरुण आहे. केवळ तरुणच नाहीये तर या युवा पिढीकडे देशाला महासत्ता बनवण्यासाठी आवश्यक असलेली दुर्दम्य इच्छाशक्ती आणि आत्मविश्वासही आहे. त्यामुळेच तर काही परकीय शक्तींनी या तरुण पिढीला आपल्या ध्येयापासून भरकवटण्यासाठी अंमली पदार्थांच्या व्यसनात ढकलले जात असल्याचा गंभीर आरोप समीर वानखेडे यांनी यावेळी केला. येथील के. सी. गांधी शाळेच्या ऑडिटोरियममध्ये झालेल्या या कार्यक्रमाला कल्याणातील 30-35 शाळा महाविद्यातील 9 ते तृतीय वर्षांपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी मोठी गर्दी केली होती.

# भिवंडी गोदाम पट्ट्याला अग्निशमन केंद्र देण्यास शासन उदासीन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
भिवंडी ( शरद भसाळे)

भिवंडी तालुक्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात ट्रान्सपोर्ट मालाची साठवणूक करणारी गोदाम आहेत. या गोदामा मध्ये फर्निचर, इलेक्ट्रॉनिक सामान, कपडा आणि रासायनिक ज्वलनशील पदार्थ व इतर मालाची मोठ्या प्रमाणात साठवणूक केली जाते मात्र गोदाम चालक व मालक वर्गाकडून अनेक वेळा गोदाम सुरक्षितता बाळगण्यास दिरंगाई होत असल्यामुळे या गोदामांना मोठ्या प्रमाणात आगी लागल्याचे प्रकार घडत आहे,ही आग विझवण्यासाठी भिवंडी व ठाणे,कल्याण डोंबिवली महापालिकेच्या अग्निशमन दलाला पाचारण करावे लागते वाहतूक कोंडीमुळे अग्निशमन दल जवान वेळेवर पोहोचत नाही त्यामुळे मालमत्तेचे मोठे नुकसान होते.शासनाकडून विकास शुल्क नावाने मोठ्या प्रमाणात मालमत्ता कर वसूल केला जात आहे.मात्र सुविधा उपलब्ध करुन देण्यास चालढकल होत आहे. ग्रामीण भागात अग्निशमन दल केंद्राची आवश्यकता आहे,शासनाकडे याबाबत वारंवार स्थानिक ग्रामस्थांनी मागणी केली आहे मात्र अद्याप शासनाने या संदर्भात कोणत्याही प्रकारची ठोस पावलं उचलली नसल्यामुळे व्यापारी व ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.राज्य शासनाने तातडीने भिवंडी ग्रामीण भागात सुसज्ज असे अग्निशमन केंद्र उभारावे अशी मागणी शिवसेनेचे ग्रामीण जिल्हाप्रमुख व एमएमआरडीए सदस्य देवानंद थळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे.

गोदामांची नगरी म्हणून भिवंडीची ओळख शासनस्तरावर निर्माण झाली आहे असुन राज्यातील

**स्वतंत्र अग्निशामक केंद्र उभारणीस एमएमआरडीए प्राधिकरणाने सकारात्मक भूमिका घेऊन मंजुरी दिली आहे मात्र आजपर्यंत ही यंत्रणा का सुरू केली नाही? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.**



नामांकित कंपन्यांची गोदामे भिवंडीत थाटली आहेत. सुमारे ५० हजारांहून अधिक गोदाम काल्हेर,कशेळी,पूर्णा,दापोडा, राहनाळ,मानकोली कोनगांव, रांजणोली व पडघा अशा विविध ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात उभारण्यात आली आहेत. ग्रामीण भागाचा विकसित करण्याची जबाबदारी शासनाने एमएमआरडीए प्राधिकरणाकडे सोपविली परंतु गेल्या10 वर्षांच्या काळात या भागात विकास शुल्क म्हणून कोट्यवधी रुपये जमा करणाऱ्या एमएमआरडीए प्रशासनाने भिवंडी ग्रामीण भागात स्वतंत्र अग्निशमन केंद्र उभारण्यात पुढाकार घेतला नाही.जेव्हा गोदामांना आग लागते त्यावेळेस भिवंडी व ठाणे, कल्याण अग्निशमन दलावर आग विझविण्याची वेळ येते.भिवंडी ग्रामीण भागातील रस्ते काही प्रमाणात अरूंद व खराब असल्याने अग्निशमन दलाचे गाड्या वाहतूक कोंडीत अडकतात परिणामी घटनास्थळी पोहोचण्यास अग्निशमन दलाच्या जवानांना उशीर होत असतो तोपर्यंत मालमत्ता जळून मोठे नुकसान होत असल्याची माहिती एमएमआरडीएचे सदस्य देवानंद थळे यांनी दिली.या गंभीर प्रश्नाकडे एमएमआरडीए प्रशासनाने आजपर्यंत लक्ष दिले नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. लागणारी भिषण आग विझविताना जवानांना संकटांचा सामना करावा लागतो ही शोकांतिका आहे. वाहतूक कोंडी, गोदाम भागातील अरुंद रस्ते व त्याठिकाणी पाण्याची कमतरता यामुळे या भागातील आग विझवितांना अग्निशमन दलाची मोठी दमछाक होते.ज्वलनशील रासायनिक पदार्थ साठवणूक केलेल्या गोदामांना भिषण आग विझविण्यासाठी अनेकवेळा सुविधा व पाणी पुरवठा उपलब्ध नसल्याने दोन दोन दिवस आग विझविण्यासाठी लागत असतात. त्यामुळे मालमत्ता व वित्तहानी मोठ्या प्रमाणात होते.सन 2022 ते 2024 या तीन वर्षात शहरात 415, तर ग्रामीण भागात याच काळात 275 आगीच्या घटना घडल्याचे सुत्रांनी सांगितले तर या तीन वर्षाच्या काळात शहरात 414 तर ग्रामीण भागात 102 रेस्क्यू वर्दी केल्याचे सांगण्यात आले. तरीही या भागांत अग्निशमन केंद्र का ? उभारले जात नाही असा सवाल शिवसेनेचे जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांनी उपस्थित केला असुन राज्य शासनाने तातडीने भिवंडी ग्रामीण भागात सुसज्ज अग्निशमन केंद्र उभारण्यात यावे अशी मागणी केली आहे.

# पूर्ववैमनस्यातून उल्हासनगरात तरुणाची निर्घृण हत्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगरः** उल्हासनगर शहर पुन्हा एकदा एका हत्येच्या घटनेने हादरले आहे. उल्हासनगरातील कॅम्प एक भागात जुन्या वादातून एका व्यक्तीची हत्या करण्यात आली आहे. साजिद शेख असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी उल्हासनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून दोन आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे.

या घटनेतील आरोपी रोहित पासी आणि मृत साजिद शेख यांचे काही वाद झाले होते. हे वाद मिटवण्यासाठी दोन दिवसांपूर्वी त्यांनी एकमेकांशी भेटही घेतली अशी माहिती आहे. या भेटीत वाद मिटण्याऐवजी ते वाढले. २ ऑगस्ट रोजी मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास रोहित पासी आणि त्याचा साथीदार प्रवीण उज्जैनवाल यांनी साजिदच्या मित्राला रस्त्यात अडवले.

साजिदला बोलवण्यासाठी त्याला धमकी देण्यात आली. त्यावेळी साजिद शेख मित्राच्या मदतीसाठी धावून गेला. मात्र त्याचवेळी साजिदवर दहा ते पंधरा जणांनी मिळून हल्ला चढवला. धारदार शस्त्रांनी झालेल्या हल्ल्यात साजिद शेख गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तेथे साजिद शेख याला मृत घोषित केले. ही संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली आहे.

या घटनेनंतर उल्हासनगर पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करत रोहित पासी आणि प्रवीण उज्जीनवाल यांना अटक केली. मात्र उर्वरित आरोपी अजूनही फरार आहेत. त्यामुळे संतप्त झालेल्या साजिदच्या गरोदर पत्नीने रुग्णालयातच मृतदेह स्वीकारण्यास स्पष्ट नकार दिला. सर्व आरोपींना अटक होत नाही, तोपर्यंत साजिदचे शव उचलणार नाही, असा पवित्रा साजिदच्या पत्नीने घेतला होता. या घटनेनंतर परिसरात खळबळ माजली असून नागरिकांत भीतीचं वातावरण आहे.

पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला असून इतर आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथक कार्यरत करण्यात आली आहेत. पोलिस उपायुक्त सचिन गोरे यांच्या नेतृत्वाखाली तपास वेगाने सुरू असून, लवकरच उर्वरित आरोपींना अटक केली जाईल, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. गेले काही महिन्यात परिमंडळ चार मध्ये गुन्ह्यांची संख्या वाढली आहे. हत्या, गोळीबार या गुन्ह्यांमध्ये लक्षणीय वाढ दिसून आली आहे.

अंबरनाथ येथील बांधकाम व्यवसायिकाच्या घरावर झालेला गोळीबार, बदलापूर येथे एका व्यक्तीवर टोळीने केलेला गोळीबार या घटनांनी बदलापूर आणि अंबरनाथ ही शहरे सुद्धा हादरून गेली होती. उल्हासनगर शहरातच विनयभंगाच्या प्रकरणातील आरोपीने पीडित तरुणीच्या घरासमोरच मिरवणूक काढून कायदा सुव्यवस्थेचे धिंडवडे काढले होते. त्यामुळे हे प्रकार रोखण्यासाठी कठोर कारवाईची मागणी होते आहे.



# ७७ वर्षानंतरही स्मशानभूमीकडे जायला रस्ता नाही

## कल्याण तालुक्यातील म्हसकळ गावाची दारुण अवस्था

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण तालुक्यातील म्हसकळ गाव आजही मूलभूत सुविधांपासून वंचित आहे. या गावात मृतदेह नेण्यासाठी सुद्धा रस्ता उपलब्ध नसल्याचे विदारक वास्तव काल समोर आले. एका वृद्धाच्या अंत्यविधीसाठी गावकऱ्यांना चिखल, गोटे आणि माती तुडवत मृतदेह स्मशानभूमीकडे नेण्याची वेळ आली. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर गावाची ही वाईट अवस्था पुन्हा एकदा चर्चेत आली.

पूर्वी स्मशानभूमीकडे जाण्यासाठी गावदांड रस्त्याचा वापर होत असे, पण त्या मार्गावर खाजगी मालकीच्या जमिनीवर वॉल कंपाउंड उभारण्यात आल्याने हा मार्ग बंद झाला आहे. याच रस्त्यावरून जलजीवन मिशन अंतर्गत पाईपलाईनही टाकण्यात आली होती. मात्र आता त्या मार्गाचा वापर करता येत नसल्याने गावकऱ्यांना तात्पुरत्या, कच्च्या आणि धोकादायक मार्गाने मृतदेह नेण्याची वेळ येते. पावसाळ्यात हा रस्ता चिखलात बुडतो आणि त्यावरून वृद्ध, महिला आणि लहान मुलांना चालणेही अशक्य होते. त्यामुळे केवळ अडथळेच नव्हे, तर मयतांच्या सन्मानाला धक्का पोहचतो, अशी भावना ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

या प्रश्नाबाबत गावकऱ्यांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी केल्या असून, अतिक्रमणाविरोधात कारवाई करण्याचे आदेश दिले गेले, तरीही प्रत्यक्षात काहीही झालेले नाही. "जिथं मृत व्यक्तीलाही सन्मानाने शेवटचा निरोप देता येत नाही, तिथं विकास कशाला हवा?" असा संतप्त सवाल गावकरी विचारत आहेत. गावात यामुळे असंतोष वाढला असून येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये ग्रामस्थ मतपेटीतून आपला संताप व्यक्त करतील, हे स्पष्ट दिसत आहे. ग्रामस्थांनी आता १५ ऑगस्टला ग्रामसभा घेऊन ठिय्या आंदोलन किंवा उपोषणाची तयारी सुरू केली आहे.

याबाबत तहसीलदार सचिन शेजळ यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी ग्रामपंचायत मार्फत बीडीओ स्तराशी निगडित असून शेतीत जाण्यासंदर्भात विषय असता तर सुनवाणी घेत मार्गी लावता येतो असे सांगितले." कल्याण पंचायत समिती बीडीओ संजय भोये यांच्याशी संपर्क साधला असता संपर्क होऊ शकला नाही.

# समाजाला दत्ता कांबळे सारख्या जनसेवकांची गरज -राष्ट्रपती पुरस्कार विजेते प्रसाद पांढरे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
पेण(प्रतिनिधी)

समाजाला खऱ्या अर्थाने दत्ता कांबळे सारख्या समाजसेवकांची नितांत गरज असून स्वतःच्या वाढदिवसानिमित्त यापुढेही अशीच समाजोपयोगी सेवा त्यांनी कायम सुरू ठेवावी असे गौरवोद्गार राष्ट्रपती पदक विजेते, वडखळ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांनी दादर गाव येथे बोलताना काढले. पेणचे समाजसेवक दत्ता कांबळे यांच्या 38 व्या वाढदिवसानिमित्त माध्यमिक विद्यालय दादर येथे रायगडचे अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी पिण्यासाठी वॉटर फिल्टर व कुलरचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. यावेळी शाळा परिसरात



वृक्षारोपणसह पेण पत्रकारांना प्रत्येकी पाच लाख रुपयांचे इन्श्युरन्सचे वाटप करण्यात आले.

सदर उद्घाटन कार्यक्रमास रायगडचे अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, वक्रतुंड मित्र मंडळाचे संस्थापक दत्ता कांबळे, वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे, स्कुल कमिटी चेअरमन धनाजी पाटील, मोहन नाईक, साधना कांबळे, राजेश्री कांबळे, माध्यमिक विद्यालय दादर प्राचार्य डी.एस.पाटील, पेण प्रेस क्लब अध्यक्ष देवा पेरवी, राज कडू, मंगेश पाटील, राजू कांबळे, प्रवीण पाटील, ओमकार डाकी आदीं मान्यवर उपस्थित होते.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, वाढदिवस अनेकांचे येत असतात जात असतात मात्र आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो या भावनेतून प्रत्येकाने समाजकार्य करणे गरजेचे असते. आपल्या समाजाला दत्ता कांबळे सारख्या खऱ्याखुऱ्या समाजसेवकाची नितांत गरज आहे. कारण दत्ता कांबळे दरवर्षी त्यांच्या वाढदिवसाला समाजउपयोगी कार्य करत असतो असे प्रसाद पांढरे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले. तर दत्ता कांबळे यांनी बोलताना सांगितले की, सुधागड एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या सर्वच शाळांची शिक्षण पद्धती चांगली असून या संस्थेच्या शाळांमुळे ग्रामीण भागातील व डोंगर दऱ्यांमधून येणारे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

माध्यमिक विद्यालय दादर शाळेच्या विद्यार्थ्यांनी लेझीम पथक व ढोल ताश्यांच्या गजरात मान्यवरांचे स्वागत केले. त्यानंतर वक्रतुंड मित्र मंडळ पेण यांच्या संयोजनाने आयोजित करण्यात आलेल्या माध्यमिक विद्यालय दादर शाळेतील विद्यार्थ्यांना शुद्ध पाणी पिण्यासाठी वॉटर फिल्टर व कुलरचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळा परिसरात अप्पर पोलीस अधीक्षक अभिजित शिवथरे यांच्या हस्ते झाडे लावत वृक्षारोपण करण्यात आले. तसेच उपस्थित पेण मधील सर्व पत्रकारांना ओरिएंटल कंपनीचा प्रत्येकी पाच लाख रुपयांचा विमा वाटप करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वक्रतुंड मित्र मंडळाचे पदाधिकारी स्वप्नील पाटील यांनी तर आभार प्राचार्य डी.एस.पाटील व सूत्रसंचालन रोशन पाटील, बी.एस.पाटील यांनी केले.



# ठाणे महानगर पालिकेच्यावतीने क्रांतीसिंह नाना पाटील यांना अभिवादन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे महानगरपालिकेच्यावतीने क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. महापालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर यांच्यासह संदीप झिनवाल, मंदार गायकवाड आदी महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.




Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.